पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष :- २०१७-२०१८

# समाजशास्त्र विभाग

प्राचार्य
डॉ. एस. आर .टकले

विभाग प्रमुख
डॉ. मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
# वार्षिक अहवाल २०१७- २०१८
# समाजशास्त्र विभाग

समाजशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१७ - २०१८ मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले आहेत.

**कै. धुपाजी खोतकर पुरस्कार :-**

समाजशास्त्र बी. ए. तृतीय वर्षातील मुख्य विषय घेतलेल्या विद्यार्थ्यातून (शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ साठी) प्रथम आलेल्या कु. ईश्वरी काथार हया विद्यार्थीनीस शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ चा कै. धुपाजी खोतकर पुरस्कार दिनांक :- ९ ऑगस्ट २०१७ रोजी देण्यात आला.

**अतिथी व्याख्यान:-**

दिनांक ४ सप्टेंबर २०१७ रोजी डॉ. संग्राम गुंजाळ (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांनी **समाजशास्त्र विषयातील व्यावसायिक संधी** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक ०९ जानेवारी २०१८ रोजी डॉ.साहेबराव हिवाळे (समाजशास्त्र विभाग, विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर) यांनी **भारतीय लोकशाही आणि भारतीय राज्यघटना** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**भित्तीपत्रक प्रकाशन:-**

दिनांक १७ सप्टेंबर २०१७ रोजी **भारतातील कुपोषण एक गंभीर समस्या** या विषयाचे भित्तीपत्रक प्रकाशित करण्यात आले.

दिनांक २६ जानेवारी २०१८ रोजी **दहशतवाद :एक जागतिक समस्या** या विषयाचे भित्तीपत्रक प्रकाशित करण्यात आले.

**सेमिनार व गटचर्चा :-**

दिनांक १४ सप्टेंबर २०१७ रोजी बी. ए. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे **समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना** या विषयावर सेमिनार घेण्यात आले.

दिनांक २३ सप्टेंबर २०१७ रोजी बी. ए. द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची **कुपोषण व महिला आरोग्य** या विषयावर गटचर्चा घेण्यात आली.

**महापरिनिर्वाण दिन व्याख्यान :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्त दि. ६ डिसेंबर २०१७ रोजी प्रा. जयश्री गायकवाड (समाजशास्त्र विभाग, अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना) यांचे **डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सक्षमीकरणातील योगदान** या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रा. जयश्री गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबडेकरानी मांडलेले हिंदू कोड बील, घटनेत महिलांना देण्यात आलेले अधिकार या विषयी मार्गदर्शन केले. सदरील व्याख्यान कार्यक्रमास प्राचार्यडॉ. एस. आर. टकले सर अध्यक्ष म्हणून लाभले होते.

**अभ्यास सहल:-**

समाजशास्त्र विभागाची दिनांक ९ डिसेंबर २०१७ रोजी बाबा भांड यांच्या गिरनेर तांडा येथील अपंग व मुकबधीर मुलांच्या निवासी शाळेत अभ्यास सहल नेण्यात आली. सदरील सहलीत १३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**सामंजस्य करार:-**

महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाशी दिनांक २३ सप्टेंबर २०१७ रोजी सामंजस्य करार करण्यात आला.

**सामाजिक सर्वेक्षण:-**

समाजशास्त्र विभागाने जानेवारी २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात ग्रामीण महिलांमधील अंधश्रद्धा या विषयावर सामाजिक सर्वेक्षण केले.

**प्रकल्प अहवाल सादरीकरण :-**

समाजशास्त्र विभागाच्या बी. ए तृतीय वर्ष (मुख्य विषय) विद्यार्थ्यांच्या प्रकल्प अहवालाचे सादरीकरण दि. १२ मार्च २०१८ रोजी करण्यात आले. प्रकल्प अहवालाच्या मुल्यमापनासाठी डॉ. प्रमिला भुजाडे (समाजशास्त्र विभाग, शासकिय ज्ञान विज्ञान महाविद्यालय औरंगाबाद) या बहिस्त परिक्षक म्हणून लाभल्या होत्या.

**पी. पी.टी तासिका :-**

**समाजशास्त्र विभागाच्या वतीने वर्षभरात सहा पी. पी. टी तासिका घेण्यात आल्या आहेत.**

| अ. क्र | दिनांक | वर्ग | विषय |
|---|---|---|---|
| १ | २८/०७ /२०१७ | BATY | संशोधनाचे प्रकार |
| २ | ३०/०८/२०१७ | BAFY | समाजशास्त्रीय दृष्टिकोण |
| ३ | १२/९/२०१७ | BAFY | सामाजिकरणाचे साधने |
| ४ | ०७/१२/२०१७ | BATY | सामाजिक क्रिया सिध्दांत |
| ५ | ०६/०१/ २०१८ | BASY | दुर्बल घटकांच्या समस्या |
| ६ | २१/१२/२०१८ | BASY | लोकसंख्या धोरण |

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

# व

# डॉ. बाबासाहेब आबेंडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद प्रायोजित

# समाजशास्त्र राष्ट्रीय परिषद अहवाल

## "जागतिकीकरण आणि भारतातील ग्रामीण स्थित्यंतरे" दि. २८ फेब्रुवारी २०१८

## (Globalization and Rural Transforamtion in India)

जागतिकीकरण आणि ग्रामीण स्थित्यंतरे या विषयावर महाविद्यालयामध्ये दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी एक दिवशीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. सदरील परिषदेत ६७ प्राध्यापक व संशोधकांनी सहभाग घेतला.

**उद्घाटन सत्र**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यायातील समाजशास्त्र विभाग प्रायोजित ग्लोबलायझेशन ॲण्ड रूरल ट्रान्सफॉर्मिशन इन इंडिया या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन डॉ. मनोज कुमार जेना (सहयोगी प्राध्यापक, सामाजिक व्यवस्था अभ्यासकेंद्र, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली) यांनी केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय साळुंके यांची उपस्थिती होती तर परिषदेच्या उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे विश्वस्त डॉ. सर्जेराव ठोंबरे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केले. ज्यात त्यांनी महाविद्यालयाची आतापर्यंत झालेली वाटचाल आणि विकास यासंबंधी विवेचन केले.

प्रास्ताविका नंतर मान्यवरांच्या हस्ते परिषदेची स्मरणीका प्रकाशित करण्यात आली. आपल्या बिजभाषणात डॉ. मनोज कुमार जेना म्हणाले की, ग्रामीण भागाची जुनी ओळख संपुष्टात येऊन खेडी ही ग्लोबल बनली आहेत. जागतिकरनाते सर्व समाज घटकांना एकत्रित जोडले पाहिजे. जगतिकीकरणाने समाजात सकारात्मक बदल घडवून आणावेत अशी अपेक्षा आहे. हा विकास पर्यावरण व मानव यांना जोडणारा असावा. डॉ. संजय साळुंके म्हणाले की, जागतिकीकरणाने भांडवलशाही देशात आली आणि काही विशिष्ट अशा सामाजाकडे संपत्ती एकवटली आहे. संपत्तीचे विकेंद्रीकरण होऊन समाजाच्या सर्व घटकांना विकासची संधी मिळावी. या जागतिकीकरणाची संधी समाजातील सर्वच घटक चाखत आहेत. जागतिकीकरणाने ग्रामीण भागातील वैशिष्ट्येपूर्ण ओळखीला छेद देण्याचा प्रयत्न केला आहे.

अध्यक्षीय समारोपात डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी असे प्रतिपादन केले की, जागतिकी करणाने ग्रामीण समाज जीवनात जे बदल घडवून आणले आहेत ते पर्यावरण पुरक असावेत. जागतिकीकरणातून वसुधैव: कुंटुंबकम ही संकल्पना पुढे आली आहे. उद्घाटन सत्राचे सूत्रसंचालन डॉ. अश्विन रांजणीकर व लक्ष्मीकांत ढेपले यांनी केले. परिषद समन्वयक डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी आभार मानले.

**पहिले सत्र**

**जागतिकीकरणाचा ग्रामीण स्थित्यंतरावर झालेला परिणाम (Impact of Globalization on Rural Transformation in India):-** उद्घाटन सत्रानंतर झालेल्या पहिल्या सत्रात परिषदेत सहभागी झालेल्या प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांच्या शोध निबंधाचे वाचन झाले. सदरील सत्रास अध्यक्ष म्हणून डॉ. बालाजी केंद्र (समाजशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ) हे लाभले होते. उपाध्यक्ष म्हणून डॉ. सुधीर येवले (कालीका देवी महाविद्यालय, शिरूर, बीड) हे होते तर अहवाल लेखक म्हणून प्रा. राज पोपळघट (राजर्षी शाहु महाविद्यालय, पार्थी) उपस्थित होते.

सदरील सत्रात ३२ जणांनी आपले शोधनिबंध सादर केले. सादर केलेल्या शोधनिबंधावर प्रश्नोत्तरे व चर्चा घडून आली. सत्राच्या अध्यक्षीय समारोपात डॉ. बालाजी केंद्रे यांनी सदरील सत्रात झालेल्या विषयाची चर्चा व विष्कर्ष मांडले. ते म्हणाले की, जागतिकीकरणाचा ग्रामीण स्थित्यंतरावर होणारे परिणाम सकारात्मक व नाकारात्मक दोन्ही बाजूने अभ्यासने गरजेचे आहे.

**दुसरे सत्र**

**ग्रामीण विकास कार्यक्रम (Rural Development Programme):-** भोजनानंतर झालेल्या दुसऱ्या सत्रात ग्रामीण विकास कार्यक्रम या विषयावर परिषदेत सहभागी झालेल्या प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांच्या शोधनिबंधाचे वाचन झाले. सदरील सत्रास अध्यक्षस्थानी डॉ. हनुमंत मिसाळ (श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर) हे लाभले होते. उपाध्यक्ष म्हणून डॉ. कालीदास भांगे (श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगांव रंगारी) हे तर अहवाल लेखक म्हणून डॉ. देवराव दराडे

(वसंतराव नाईक कॉलेज, औरंगाबाद) लाभले होते. सदरील सत्रात ३० जणांनी आपले शोधनिबंध सादर केले. सादर केलेल्या शोधनिबंधावर प्रश्नोत्तरे व चर्चा घडून आली.

सत्राच्या अध्यक्षीय समारोपात डॉ. हनुमंत मिसाळ यांनी सदरील सत्रात झालेल्या विषयाची चर्चा व निष्कर्ष मांडले. ते म्हणाले की, शासन ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध शासकीय योजना राबवित आहे. या योजनांच्या यश-अपयशाचे मुल्यमापन होऊन त्यात सुधारणा अथवा बदल करणे गरजेचे आहे. दोन्ही सत्रात काही प्राध्यापकांनी PPT द्वारे आपल्या शोधनिबंधाचे सादरीकरण केले.

**समारोप समारंभ**

राष्ट्रीय परिषदेच्या समारोप सत्रास अध्यक्ष म्हणून श्री देवजीभाई पटेल (उपाध्यक्ष, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था) हे लाभले होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. बालाजी केंद्रे (मुंबई विद्यापीठ) प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. दा. धो. काचोळे (अध्यक्ष, सोशल रिसर्च, फाऊंडेशन औरगाबाद) हे लाभले होते. समारोप प्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. बालाजी केंद्रे म्हणाले की, ग्रामीण विकासासाठी शासन विविध योजना व धोरणे राबवित आहे. मात्र असे असले तरी त्याचा लाभ समाजातील तळागाळातील लोकांना होत नाही. त्यासाठी या योजनांची अंमलबजावणी चांगल्या पद्धतीने होणे गरजेचे आहे. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत ग्रामीण भागातील शेतकरी व करागिर टिकला पाहिजे. या परिवर्तनाच्या प्रक्रियेत त्याचाही विकास झ ाला पाहिजे. डॉ. दा. धो. काचोळे म्हणाले की, जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागात जे विविध स्वरूपाचे बदल होत आहेत त्यावर संशोधन होणे गरजेचे आहे. परिषदे विषयी प्रतिक्रिया डॉ. सुधीर येवले व डॉ देवराव दराडे यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या व ही परिषद यशस्वी झाली असे मत मांडले.

या सत्रात उत्कृष्ट शोधनिबंधासाठी प्रा.रमेश नारायण ढवळे (कृषि महाविद्यालय, लातूर), प्रा. शेषराव राठोड (विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर) श्री बाबासाहेब छबुराव लहाने (श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री) यांना पुरस्कार देण्यात आले. अध्यक्षीय समारोपात श्री देवजीभाई पटेल यांनी असे मत व्यक्त केले की, ग्रामीण समाज जीवनाचे प्रश्न व समस्यांचा अभ्यास करून त्या सोडविण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत. शिक्षकांवर समाजाची फार मोठी जबाबदारी आहे. समारोप सत्राचे सुत्रसंचलन डॉ. महेश थोरात यांनी केले. तर उपस्थित मान्यवर प्राध्यापक व संशोधक यांचे आभार डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी मानले. या राष्ट्रीय परिषदेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, डॉ. मंजुषा नळगीरकर (परिषद समन्वयक), प्रा. अनिल जाधव यांनी परिश्रम घेतले. या परिषदेस महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.`

## समाजशास्त्र विभाग

## अभ्यास सहल वृत्तांत

समाजशास्त्र विभाग विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणिव निर्माण व्हावी म्हणून दरवर्षी अभ्यास सहलीचे आयोजन करित असतो. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये समाजशास्त्र विभागाची अभ्यास सहल प्रसिध्द साहित्यिक श्री बाबा भांड सरांच्या गेरनेरातांडा येथील अंपग व मुकबधीर विद्यार्थ्याच्या निवासी शाळेत दि. ९ डिसेबर २०१७ रोजी नेण्यात आली. सदरील सहलीत १३ विद्यार्थ्यानी सहभाग घेतला. ही शाळा औरंगाबाद पासून पैठण कडे जातांना ८ किलोमिटर अंतरावर आहे. अतिशय निसर्गरम्य परिसरात ही शाळा वसलेली आहे. श्री बाबा भांड सराच्या आश्रम शाळेत पोहचलो असता भांड सरांच्या पत्नी श्रीमती अंजली भांड मॅडम यांची भेट झाली, त्यांनी आश्रम शाळेविषयी माहिती दिली. नुकताच बाबा भांड सरांच्या कांदबरीवर आधारित दशक्रिया या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. त्या संदर्भात मॅडमनी विद्यार्थ्याना माहिती दिली. आपल्या समाजातील अंधश्रध्दा व जगण्यासाठी करावे लागणारे काम या विषयी मार्मीक विवेचन केले. या चर्चेनंतर आम्ही अपंग मुलांची भेट घेतली शाळेत ३० अंपग मुले व ३० मुकबधीर मुले होती. त्यांना शिकविण्यासाठी ६ प्रशिक्षित शिक्षक होती. हे सर्व शिक्षक मुलांना अतिशय प्रेमाने व आत्मियतेने शिकवतात. हि सर्व मुले ५ ते १२ वर्षे वयोगटातील होती. या आश्रमशाळेत ५वी पर्यंतच वर्ग आहेत. पुढील वर्गासाठी / शिक्षणासाठी मुलांना अन्य शाळेत पाठविले जाते. अपंग मुलांनी गाणी व कविता म्हणून दाखविली. एका मुलाच्या हाताला पंजा नव्हाता तर एका मुलाच्या हाताचा पंजा वाकडा झालेला होता दोन्ही मुलांनी त्याच हातांनी सुंदर हस्ताक्षरात स्वत:चे नाव लिहून दाखविले. मुकबधीर मुलांनी फळयावर कविता, प्राण्यांची नावे लिहुन दाखविली. मुलांना ऐकू जरी येत नसले तरी त्यांना कानात विशिष्ट हेडफोनव्दारे गाणी व आवाज ऐकवण्याचा प्रयत्न केला जातो.

मुकबधीर व अंपग मुलांची शाळेतच निवासाची व्यवस्था आहे. त्यांना सांभाळायला मावशी व काका नेमलेले आहेत, ते सर्व मुलांची काळजी घेतात. मुलांना अंघोळ घालणे, त्यांच्या रुमची स्वच्छता, कपडे धुणे, आजारी मुलांची काळजी घेणे, त्यांना टि. व्ही लावून देणे, त्यांच्या सोबत खेळणे, त्यांना जेवू घालणे इ. कामे ते खूप प्रेमाने करतात. मुकबधीर व अंपग मुलांसाठी एक स्वतंत्र व प्रशस्त रंगमंच उभारण्यात आले आहे. त्याठीकाणी मुलांचे विविध सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित केले जातात.

समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यानी या मुलां सोबत आपला वेळ घालवला त्यांच्या सोबत खेळले तसेच काही मुलीनी या मुलांना जेवू घातले. ही सर्व गोडस मुले अंपगत्वमुळे व कुटुंबातील आर्थिक हालाकीच्या परिस्थितीमुळे आपल्या आई वडिलांपासून दूर आश्रमशाळेत राहतात ही बाब अनेक विद्यार्थ्याना मनाला चटका लावून गेली. या अभ्यास सहलीतून आमचे विद्यार्थी हे शिकले की, समाजात अशा अनेक व्यक्ती आहेत ज्यांना जन्मत:च अंपगत्व आलेल आहे. पण तरी देखील ते आपल्या अंपगत्वावर मात करून आनंदी जीवन जगतात. तर मग आपण तर शारिरिक व मानसिकदृष्टया सुदृढ आहोत, आपल्याना जगण्याची सकारात्मक उर्जा या मुलांकडून मिळते आणि आपणही जीवनात दु:ख करण्यापेक्षा आनंद शोधावा.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

## समाजशास्त्र विभाग

## कार्यक्रमाची छायाचित्रे २०१७-१८

### कै. धुपाजी खोतकर पुरस्कार



डॉ. यजुर्वेन्द्र महाजन यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना कु. ईश्वरी काथार

### अभ्यागत तासिका



डॉ. संग्राम गुंजाळ (डॉ.बा.आं.म. विद्यापीठ,औरंगाबाद)
हे समाजशास्त्र विषयातील व्यावसायिक संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना.



डॉ.साहेबराव हिवाळे (विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर)
हे भारतीय लोकशाही आणि भारतीय राज्यघटना या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना.

### भित्तीपत्रक प्रकाशन



भारतातील कुपोषण एक गंभीर समस्या या विषयाचे भित्तीपत्रक प्रकाशित करतांना.




दहशतवाद : एक जागतिक समस्या या विषयाचे भित्तीयत्रक प्रकाशित करतांना.

## गटचर्चा



कुपोषण व महिला आरोग्य या विषयावर गटचर्चा करतांना बी. ए. द्वितीय व तृतीय वर्षाचे विद्यार्थी

## सेमिनार



समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना या विषयावर सेमिनार देतांना बी. ए. प्रथम वर्षाचा विद्यार्थी राजू खरात.

## महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम :-



दि. ६ डिसेंबर २०१७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सक्षमीकरणातील योगदान या विषयावर प्रा. जयश्री गायकवाड मार्गदर्शन करतांना

## सामाजिक सर्वेक्षण



समाजशास्त्र विभागाने जानेवारी २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात विषयावर सर्वेक्षण करतांना या विद्यार्थीनी कु. ज्योती उदे व कु. प्रियंका गायकवाड

## सामंजस्य करार




आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र **ग्रामीण महिलांमधील अंधश्रद्धा या** विभागाशी सामंजस्य करार करण्यात आला. या प्रसंगी डॉ. संजय सांळुके, डॉ.एस. आर. टकले, डॉ. मंजुषा नळगीरकर,

# प्रकल्प अहवाल सादरीकरण




डॉ. प्रमिला भुजाड यांच्या समोर प्रकल्प अहवालाचे सादरीकरण करतांना कु. ललिता बोरडे दि. १२ मार्च २०१८

## बातमी :- दिव्य मराठी दि २६ सप्टेंबर २०१७

### श्री संत सावता माळी महाविद्यालय - विद्यापीठाच्या विभागांतर्गत करार

**फुलंब्री** |-येथील श्रीसंत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री आणि समाजशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद या दोन्ही विभागांतर्गत सामंजस्य करार सोमवारी (दि. २५) मंजूर करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय साळुंके, डॉ. स्मिता अवचार, डॉ. संग्राम गुंजाळ, डॉ. लक्ष्मण बागवान, डॉ. लक्ष्मण साळोखे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, श्रीसंत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. मंजूषा नळगीरकर, डॉ. नीलिमा पांडे (समाजकार्य महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांची उपस्थिती होती.

# सामाजशास्त्र विभाग
# अभ्यास सहल फोटो
# दि. ९ डिसेबर २०१७
# अपंग व मुकबधीर मुलांची निवासी शाळा गिरनेरातांडा



श्रीमती अंजली भांड विद्यार्थ्यांशी दशक्रिया चित्रपटा विषयी चर्चा करतांना.




मुकबधीर व अंपग विद्यार्थ्यी व शिक्षकांसोबत समाजशास्त्र विभागाचे  विद्यार्थी



मुकबधीर विद्यार्थी फलक लेखन करतांना.



समाजशास्त्र विभागाचे  विद्यार्थी मुलानां जेवन भरवतांना.



अंपग विद्यार्थी सुंदर हस्ताक्षरात नाव लिहीतांना.

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## व

## डॉ. बाबासाहेब आबेंडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद प्रायोजित

## समाजशास्त्र राष्ट्रीय परिषद फोटो

**"जागतिकीकरण आणि भारतातील ग्रामीण स्थित्यंतरे" दि. २८ फेब्रुवारी २०१८**

**(Globalization and Rural Transforamtion in India)**



राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करतांना डॉ. मनोज कुमार जेना




मांन्यवर परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करतांना.




डॉ. मनोज कुमार जेना "जागतिकीकरण आणि भारतातील ग्रामीण स्थित्यंतरे" याविषयी मार्गदर्शन करतांना.




डॉ बालाजी केंद्रे "ग्रामीण विकास कार्यक्रम" याविषयी मार्गदर्शन करतांना.